॥ मंदिर गृह प्रकाशः ज्ञानविवाहौच पंचतत्त्वानी ॥

गोमंतक मराठा समाज, गोवा

स्थापना : ८/५/१९२५

नोंदणी क्र. २४/१९६४

गोमंतक मराठा समाजाची मुखपत्रिका

# गोमंतश्री




वर्ष ४६ वे क्रमांक २६८ डिसेंबर २०२१

# गोमंतक मराठा समाज, गोवा
# केंद्रिय कार्यकारी समिती २०२०-२३

| | नाव | पद | मो. क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद घ. वाघुर्मेकर | अध्यक्ष | ९८२३०३५१५१ |
| २. | श्री. विनोद प्र. जांबावलीकर | उपाध्यक्ष | ९८२३६९५५७४ |
| ३. | श्री. मंगेश भि. कुंडईकर | चिटणीस | ९८२२१२१८९४ |
| ४. | श्री. सतीश अ. पैंगिणकर | संयुक्त चिटणीस | ९४२३१८०५२५ |
| ५. | श्री. श्रीकृष्णा ह. आस्कांवकर | खजिनदार | ७८७५३४५६७६ |
| ६. | सौ. उत्कर्षा उ. बाणस्तारकर | सदस्य | ९०९६६९९४०१ |
| ७. | ॲड. हर्षा रा. नाईक | सदस्य | ९५५२८७६५७८ |
| ८. | श्री. लक्ष्मीकांत एस. नाईक | सदस्य | ९९२३९२२२१२ |
| ९. | श्री. सुनील एस. फातर्पेकर | सदस्य | ९९२१०१६१४८ |
| १०. | श्री. जितेंद्र ना. शिरगांवकर | स्विकृत सदस्य | ७७२०९७३९६५ |
| ११. | श्री. सुनील र. पिळगांवकर | स्विकृत सदस्य | ८००७१२२५३३ |
| १२. | श्री. कपिल कि. कोरगांवकर | स्विकृत सदस्य | ८४११९४९०४५ |
| १३. | श्री. गोरख रा. मांद्रेकर | एक्स ऑफिशिओ | ९९६०४०१९२० |
| १४. | श्री. सुरेंद्र वळवईकर | अंतर्गत हिशेब तपासनीस | ९४२३८८२२०३ |
| १५. | श्री. श्रीपाद रामा आमोणकर | अंतर्गत हिशेब तपासनीस | ९८८१७१२४४० |

# गोमंतक मराठा समाज, गोवा

गोमंतक मराठा समाज, गोवा

स्थापना : ८/५/१९२५

नोंदणी क्रं. २४/१९६४

# त्रैमासिक मुखपत्रिका

## ऑक्टोबर २०२१ – डिसेंबर २०२१

# संपादकीय...

**श्री. नितीन कोरगांवकर**
ज्येष्ठ पत्रकार तथा कलाकार
मोबाईल : ९४२२४४३५१८



## भाऊसाहेब व ताईंची राजकीय कारकीर्द हवी

शिक्षण ही जीवनाची एक मौल्यवान देणगी आहे आणि संस्कार जीवनाचे सार आहे. आज जी राजकीय क्षेत्राची अधोगती झाली आहे, शरमेने मान खाली घालण्याची पाळी गोमंतकीय समाजावर आली आहे. त्यामागे हेच कारण आहे की शिक्षण या मौल्यवान देणगीचे मुल्य न पाळता त्याचे अवमुल्यन स्वार्थी राजकारण्यांनी केले आहे. आणि 'संस्कार' हेच जीवनाचे सार आहे याचा त्यांना विसर पडला आहे. या पार्श्वभूमीवर गोव्याचे भाग्यविधाते तथा पहिले मुख्यमंत्री कै. भाऊसाहेब बांदोडकर आणि त्यानंतर मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या त्यांच्या कन्या स्व. शशिकलाताई काकोडकर यांची राजकीय कारकीर्द आणि नेतृत्व याचा सार्थ अभिमान आम्हाला वाटतो. त्यांनी खऱ्या अर्थाने राजकारणाची प्रतिष्ठा उंचावली, निःस्वार्थी, समाजाभिमुख राजकीय व्यवस्थेचा आदर्श घालून दिला. म्हणूनच आज त्यांचे नाव आदराने घेतले जाते, त्यांची आठवण काढली जाते.

कुटुंब, समाज, देश शिक्षित नसेल तर प्रगत देशाची कल्पना वास्तवात कशी येणार, म्हणूनच उत्तम शिक्षण जसे मुलांना दिले पाहिजे तसेच अर्थपूर्ण आणि व्यावहारीक शिक्षणही तेवढेच गरजेचे आहे. शिक्षणात संस्कार नसतील तर मात्र ते शिक्षण माणसालाही तारू शकणार नाही आणि समाजालाही. कारण भारतीय संस्कृती, भारतीय परंपरा, भारतीय जीवन मुल्ये शिक्षणाला आधारभुत आहेत. संस्कार हे कुटुंब, परिवार, समाज, सभोवतालचे वातावरण याद्वारे बिंबवले जातात. शिक्षण आणि संस्काराची सांगड घालून जे नेतृत्व पुढे आले तसे विचारी आणि विवेकी नेतृत्व अभावानेच आढळते. आजचे राजकीय नेतृत्व हे

पैसा आणि पद यालाच सर्वस्व मानणारे आहे. मतदारही आमिषांना बळी पडून त्यांना साथ देतांना बघितले की समाजाचे, राज्याचे आणि देशाचे काय होणार हा प्रश्न उपस्थित होतो.

आता वेळ आली आहे आपली सद्‌सद्‌विवेक बुद्धी जागृत ठेवण्याची. राजकीय क्षितीज गढूळ करणाऱ्या, गोव्याच्या लौकीकाला कलंक लावणाऱ्या उमेदवारांना आणि पर्यायाने राजकीय पक्षांनाही धडा शिकविण्याची. राज्याची मालमत्ता लुटून गब्बर झालेल्या आणि मुल्ये पायदळी तुडवणाऱ्या, नीतीमत्तेचे धिंडवडे काढणाऱ्या आमदार, मंत्र्यांना घरी बसवण्याची वेळ आता आली आहे. राजकीय क्षेत्रात आज उडदामाजी काळे गोरे अशीच परिस्थिती आहे. परंतु त्यातही थोडीफार नीतीची चाड असलेले काही जुने व कुठलाही कलंक नसलेले नव्याने निवडणुकीत उतरणारे चेहरे आपल्याला निवडून त्यांना विजयी करायचे आहे, हे मात्र भान ठेवावेच लागेल.

इवल्याशा गोव्याला चाळीस आमदार आणि डझनभर मंत्री मुळात हवेतच कशाला? त्यांच्यावर होणारा वायफळ खर्च बघितला तर आतापर्यंत त्यांची संख्या अर्धी असती तर गोव्याचे निश्चितच भले झाले असते, असो पण आपण मतदान करतांना जागृत राहून योग्य त्या उमेदवाराला आणि पक्षाला मतदान केले तर बरेच काही साध्य होईल. राजकारणाचे झालेले अवमुल्यन आपण रोखू शकतो याची खुणगांठ मनोमन बाळगायला हवी कारण भाऊ, ताईंची राजकीय कारकीर्द आपल्याला आणायची आहे. समाजाचे, राज्याचे भवितव्य आपणच घडवू शकतो. फक्त समाजसन्मुख होऊन सारासार विचार करायला हवा.

●●●

# अध्यक्षीय मनोगत



**श्री. आनंद घ. वाघुर्मेकर**
(बी.ई. (सिव्हिल) एम. टेक)
अध्यक्ष केंद्रिय समिती २०२०-२०२३
मोबाईल : ९८२३०३५१५१

## अध्यक्षीय मनोगत

नमस्कार,

मला मेहमीच एक प्रश्न भेडसावत असतो, की आपल्या गोमंतक मराठा समाजातील युवा वर्ग संस्थेच्या कार्यापासून दूर रहातो. यामागे कारण तरी काय? आणि याचे उत्तर मी शोधण्याचा प्रयत्न करत असतो.

संस्थेतर्फे आपल्या युवा वर्गासाठी नेहमीच विविध योजना राबविल्या जातात. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षणासाठी आर्तिक सहाय्य, दत्तक योजना, बिनव्याजी शैक्षणिक कर्ज अशा विशेष योजना आहेत. अशावेळी युवा वर्गाने सामाजिक बांधिलकी मानून संस्थेच्या कार्यात सहभाग द्यावा असी अशी आमची माफक अपेक्षा आहे. आमच्या ज्ञातीतील तरुण-तरुणी संस्थेच्या कार्यापासून दोन हात लांब रहाणे पसंत करतात ही गोष्टच मुळी उत्साहावर्धक नाही.

युवकांना जवळ करण्यात आम्ही कुठे कमी पडतो का, की, युवा मंडळीला संस्थेच्या कार्यात रस नाही? - कारण काहीही असो मात्र युवा वर्गाला संस्थेच्या कार्यात सामावून घेण्यासाठी अलिकडेच संस्थेची युवा समिती स्थापन करण्यात आली आहे. पालकांनी संस्थेच्या विविध कार्यक्रमाना आपल्या पाल्यांसोबत उपस्थित रहाणे गरजेचे आहे. आपला युवावर्ग बुद्धीमान, ज्ञानी, कर्तृत्ववान आहे. तो अनेक गुणांनी संपन्न आहे मात्र समाजासाठी त्याची बुद्धीमत्ता, कला कौशल्य कामी येणे गरजेचे आहे. संस्थेने तालुका स्तरावरही युवा समित्या निवडल्या आहेत, यामागील उद्देश एवढाच, की आपला युवा वर्ग समाजाच्या भल्यासाठी एकत्र यावा व समाज कार्याला त्यांनी झोकून द्यावे.

आपल्या समाज संस्थेचा सर्वात तरुण अध्यक्ष म्हणून पद भूषविण्याचा मान मला मिळाला याचा आनंद आणि आभिमान मला नेहमीच असेल. समाजाप्रती आत्मियता, प्रेम असल्यामुळेच संस्थेच्या कार्यात एकरुप झालो. यापुढे आपल्या ज्ञाती समाजातील युवक-युवतींनाच संस्थेची जबाबदारी खांद्यावर पेलायची आहे, तेव्हा युवा वर्गाला कळकळीचे आवाहन करतो, की आपल्या संस्थेच्या कार्याशी जोडले जा, संस्थेच्या प्रतिष्टेत भर घाला.

●●●

# आवाहन

## डिचोली शैक्षणिक प्रकल्प

गोमंतक मराठा समाज गोवा ही आपली संस्था सामाजिक उद्देश डोळ्यांसमोर ठेऊन १९२५ मध्ये स्थापन झाली. आपल्याच समाजातील विखुरलेल्या समाजबांधवाना एका छत्राखाली आणण्याचा प्रयत्न तत्कालीन समाजधुरीणांनी केला. आपला हा समाजरुपी वृक्ष २०२५ मध्ये शताब्दी वर्ष साजरे करणार आहे.

सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाबरोबरच समाजप्रबोधन, शैक्षणिक प्रगती ही उद्दिष्ट्ये समाजाने आपल्या समोर ठेवलेली आहेत. उदाहरण द्यायचेच झाले तर पोर्तूगीज काळात १९३० मध्ये गोमंतकातील पहिले महिला वसतीगृह आपल्या समाजानेच सुरू केले आणि याचा फायदा सर्व समाजातील कामगार महिला तसेच विद्यार्थिनींना झाला. समाजाने पणजी येथील स्वतःची वास्तू याकरिता उपलब्ध केली.

गोमंतकाचे विकास पुरुष, समाजाचे आधारस्तंभ आणि मुक्त गोव्याचे पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर हे गोमंतकाच्या शैक्षणिक प्रगतीचे आद्यप्रणेते, त्यांनी रोवलेल्या शिक्षणरुपी बिजाचे रुपांतर आज वटवृक्षात झाले आहे यात संदेह नाही. भाऊसाहेबांचे हेच कार्य पुढे नेण्याचा संकल्प समाजाने सोडला असून त्या अनुषंगाने गोमंतकात उच्च शिक्षणाकरिता आवश्यक असलेल्या प्रशिक्षणाची सोय प्रशिक्षणार्थ्यांना व्हावी यासाठी समाज कार्यरत आहे. आज सीए, आयएएस, आयपीएस, युपीएससी, जीपीएससी, जेईटी, एनईटी, सीएटी, नीट, सेट इत्यादींच्या प्रवेशाकरिता लागणारे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा समाजाने संकल्प सोडलेला आहे. ही सोय गोमंतकात जर उपलब्ध झाली तर आज जी गोमंतकीय विद्यार्थ्यांची धावपळ हे ज्ञान मिळविण्याकरीता होते ती थांबेल.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून आपल्या समाजाने अर्थात गोमंतक मराठा समाज गोवाने डिचोली येथे स्वतःच्या ९०० चौ. मि. जागेत एक शैक्षणिक संकुल उभारण्याचा निश्चय केला आहे. तळमजला आणि वरचे दोन मजले अशी ही इमारत पूर्णपणे शैक्षणिक विकासासाठी असेल.

या डिचोलीच्या प्रकल्पाचा एकूण खर्च ३.५० कोटी अपेक्षित आहे. रु. २ कोटी रक्कम समाज संस्थेतून देण्यात येईल तर उर्वरीत रक्कम दात्यांकडून उभी करायची आहे. रु. १० लाख किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम पुरस्कृत करणाऱ्यांची नावे विविध खोल्यांना किंवा दालनांना द्यायचा विचार आहे. एकूण हा प्रकल्प आपणा सर्वांच्या सहकार्यावरच पुढे जाऊ शकेल.

समाजबांधवहो, पणजी येथील आपली भव्यदिव्य वास्तू आज दिमाखात स्वतःचे अस्तित्व टिकवून आहे. तिचे सारे श्रेय ५० वर्षांपूर्वी ती उभी करण्यास ज्यानी हातभार लावला त्यांना जाते. आज तशाच प्रकारची नवी वास्तू उभारण्याचे कार्य आपण सर्वजण तडीस लावूया. तुम्हां सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. तेव्हा आपण सर्वांनी या पवित्र कार्यास आर्थिक पाठबळ द्यावे आणि समाजाने सोडलेला हा संकल्प पूर्णत्वास नेण्यास मदत करावी.

आपले स्नेहांकित

**श्री. आनंद वाघुर्मेकर**
अध्यक्ष गोमंतक मराठा समाज - गोवा
मो. ९८१२३०३५१५१

**श्री. गोरख मांद्रेकर**
अध्यक्ष, बांधकाम समिती, डिचोली
मो. ९९६०४०१९२०

---

## शैक्षणिक प्रकल्पासाठी अंदाजे खर्च

### एकूण प्रकल्प खर्च ३.५० कोटी

### आराखड्यानुसार प्रत्येक वर्गखोलीचा खर्च

| वर्ग क्रमांक | क्षेत्रफळ | दर प्रति चौ. मि. | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| वर्ग - १ | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| वर्ग - २ | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| वर्ग - ३ | ६० चौ. मि. | ४०,०००/- | २४,००,०००/- |
| वर्ग - ४ | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| वर्ग - ५ | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| वर्ग - ६ | ६० चौ. मि. | ४०,०००/- | २४,००,०००/- |
| वर्ग - ७ | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| वर्ग - ८ | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| वर्ग - ९ | ६० चौ. मि. | ४०,०००/- | २४,००,०००/- |
| कॉन्फरन्स हॉल | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| ग्रंथालय | ४० चौ. मि. | ४०,०००/- | १६,००,०००/- |
| प्राध्यापक निवास खोल्या | ६० चौ. मि. | ४०,०००/- | २४,००,०००/- |

- रु. १० लाख किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम पुरस्कृत करणाऱ्यांची नावे विविध खोल्यांना किंवा दालनांना देण्यात येईल.
- रु. १० हजार किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम पुरस्कृत करणाऱ्यांची नावे नामफलकावर लावण्यात येतील.

वास्तुविशारद (आर्किटेक्ट) : श्री. यादवेंद्र दत्ता नाईक
अभियंता(इंजिनिअर) : श्री. प्रज्योत घनःश्याम वाघुर्मेकर

# डिचोली प्रकल्प बांधकाम समिती

| अ. नं. | नाव | भ्रमणध्वनी |
|---|---|---|
| १. | श्री आनंद घ. वाघुर्मेकर अध्यक्ष, केंद्रिय समिती | ९८२३०३५१५१ |
| २. | श्री. गोरख र. मांद्रेकर अध्यक्ष, बांधकाम समिती | ९९६०४०१९२० |
| ३. | श्री. मंगेश भि. कुंडईकर सचिव, केंद्रीय समिती | ९८२२१२१८९४ |
| ४. | श्री प्रसाद वि. नाईक सचिव, बांधकाम समिती | ९९२३६५५०१७ |
| ५. | श्री. श्रीकृष्ण ह. आस्कांवकर खजिनदार, केंद्रीय समिती | ७८७५३४५६७६ |
| ६. | श्री. संदेश नाईक खजिनदार, बांधकाम समिती | ९७६३३०२९२४ |
| ७. | ॲड. मनोज अ. बांदोडकर | ९८२२०४५३९१ |
| ८. | श्री. सुभाष तु. साळकर | ९८२३६२७२२० |
| ९. | श्री. उमेश अ. नाईक | ९२८४१९८१४६ |
| १०. | श्री. जितेंद्र ना. शिरगांवकर | ७७२०९७३९६५ |
| ११. | श्री. सुनिल र. पिळगांवकर | ८००७१२२५३३ |
| १२. | श्री. नंदकिशोर वि. शिरगांवकर | ८८८८७८८२४६ |
| १३. | श्री. विवेक प. नाईक | ९४२३०५८३८५ |
| १४. | श्री. प्रशांत दि. मांद्रेकर | ९४२३३१९१४६ |
| १५. | श्री. रितेश ज. नार्वेकर | ९८२२१०२९६० |
| १६. | श्री. अविनाश प्र. शिंदे | ९४२२०६०३६७ |
| १७. | श्री. सुहास ज. नाईक | ९४२३७३६४२१ |
| १८. | कु. मानसी मो. लोलयेकर | ९१५८३९४९९८ |
| १९. | श्री. गजेंद्र कलंगुटकर | ७८७५५६२५२० |
| २०. | श्री. श्रीपाद आमोणकर | ९८८१७१२४४० |
| २१. | श्री. गुरुदास नाईक | ९८२३५२४५५५ |

देणगी रोख/धनादेश स्वरुपात खालील खात्यात जमा करावी

A/c Name : Gomantak Maratha Samaj - Bicholim Project

Bank : State Bank of India

Branch : A. B. Road, Panaji (Goa)

IFSC Cod : SBIN0021839,

A/c. No. : 40588150913

Provisional 80G Reg. No. AAAAG0603QF20211

# भजन सम्राट कै. मनोहरबुवा शिरगांवकर



भजनसम्राट म्हणून सुपरिचित असलेल्या मनोहरबुवा शिरगांवकर यांचा जन्म ०४ मार्च १९१३ रोजी त्यांच्या आजोळी म्हणजे सत्तरी तालुक्यातील पिसुर्ले या गावी झाला. शहनाईवादकाच्या घराण्यात जन्मलेल्या मनोहरबुवांनी अद्वितीय स्वरूपाची कामगिरी करून दाखवणे स्वाभाविकच होते. वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी शिरगांवातील संगीत 'सौभद्र' नाटकात नारदाची भूमिका करून त्यांनी नाट्यसृष्टीत प्रवेश केला. पुढे वेगवेगळ्या नाटकातून त्यांनी भूमिका वठविल्या व दीनानाथ मंगेशकरांच्या बळवंत नाट्यमंडळीत सहभागी झाले. १९३१-३२ च्या सुमारास दत्तू कासारपालकर यांच्या नाट्यमंडळीच्या 'मेनका' आणि 'नंदकुमार' या नाटकांत त्यांनी केलेल्या भूमिका अत्यंत लोकप्रिय ठरल्या. नाट्य दिग्दर्शनाचे प्राथमिक शिक्षण त्यानी श्री. कऱ्हाडकर यांच्याकडून घेतले. १९३५ मध्ये त्यानी शिरगांव ग्रामस्थांच्या नाट्यमंडळीत संत सखुची भूमिका केली. या नाटकातील गीतांनी, अभंगानी त्यांच्या मनावर मोहिनी घातली. आदरणीय बाबा गावस यांची नावेलकर नाटक मंडळी, सखाराम बर्वे यांची प्रतिभा नाटक मंडळी त्याच प्रमाणे बाबय कासरपालकर यांच्या नाट्यमंडळीच्या अनेक नाटकांतून वेगवेगळ्या भूमिका त्यांनी साकारल्या.

आपल्या अभिजात नाट्यकलेच्या माध्यमातून त्यांनी नाट्यक्षेत्रात स्वतःचे असे एक स्थान निर्माण केले. सखारामबुवा बर्वे यांच्याकडून त्यानी जसे नाट्यकलेचे शिक्षण मिळवले, त्याचप्रमाणे भिवामामा नानोडकर यांच्याकडे त्यांनी तबला वादनाचे शिक्षण घेतले. कशीकरबुवा, कऱ्हाडकरबुवा, कर्वेबुवा या नामवंत कीर्तनकारांना त्यानी तबला आणि संवादिनी साथ केली. तबला आणि संवादिनीच्या वादन क्षेत्रात मनोहरबुवांनी स्वतःची अशी एक परंपराच निर्माण केली, असे म्हटले जाते.

मनोहरबुवा शिरगांवकर यानी १९३७ मध्ये डिचोली तालुक्यातील हळदणवाडी-मये येथे भजन विद्येचा प्रशिक्षण वर्ग सुरू केला. त्या प्रशिक्षण वर्गातून स्वर आणि लयीचे निसर्गदत्त वरदान लाभलेल्या मनोहरबुवांनी अनेक शिष्य घडविले. गोमंतकातील खेड्यापाड्याप्रमाणेच शेजारच्या कर्नाटक आणि महाराष्ट्रातील असंख्य खेड्यापाड्यात भजनी गायक व भजनप्रेमी तयार केले. १९३० ते १९७८ पर्यंत म्हणजे तब्बल पाच दशके त्यानी भजनकलेच्या माध्यमातून रसिक मनांवर अधिराज्य गाजवले.

वारकरी संप्रदायातील पारंपरिक गीतांच्या, भजनाच्या चालींना मनोहरबुवांनी

स्वतःची अशी डूब दिली. स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण शब्दोच्चारांनी आणि लयकारिने ते आपले भजन रसिकजनांच्या मनात खोलवर उतरवीत. करुणा, भाव, भक्ती, श्रद्धा, आर्तता असे अनेकविध भाव सहजपणे त्यांच्या गायनातून आविष्कृत होत असत . अभंग सादर करण्याच्या त्यांच्या विलक्षण हातोटीमुळे ते रसिकमनाला पूर्णतः गुंतवून, गुंगवून ठेवीत असत. मनोहरबुवांनी उत्तर गोव्यात ठिकठिकाणी भजनवर्ग सुरू केले. त्यातुन वारकरी सांप्रदायिक वातावरण निर्माण होऊ लागले. अतिशय व्रतस्थ भावनेने आणि सेवाभावी वृत्तीने त्यांनी भजन आणि कीर्तनात अनेक तरुणांना दिशा दाखविली.

ईश्वरभक्तीत भजन गाणे म्हणजेच परमेश्वराच्या गुणांचे स्मरण करणे. देवाचे व ईश्वराचे नामस्मरण करणे असे होते. आमच्या देशात प्राचीन काळापासून साधूसंतांनी परमेश्वर भक्तीचे एक सहज सुलभ साधन म्हणून भजन म्हणायला सुरूवात केली. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांच्या कालखंडात तर सर्वसामान्य माणसांपर्यंत भजन पोहोचले. आमच्या देशात सगळ्या प्रांतात जन्मलेले साधूसंत हेच करत होते. त्यामुळे निरक्षर असलेल्या माणसांनासुद्धा भजन गायला येत होते. हीच परंपरा पुढे संगीत क्षेत्रातल्या गायकांनी आत्मसात केली. गोवा आणि कोकण प्रदेशापुरते सांगायचे झाले तर भजन गायनाला जी लोकप्रियता आणि प्रसिद्धी मिळाली तिचे बरेचसे श्रेय भजनसम्राट कै. मनोहरबुवा शिरगांवकर यांच्यासारख्या भजनी कलाकारांना जाते. मनोहरबुवांनी गोव्यातल्या खेड्यापाड्यात आपल्या मधुर आणि भावपूर्ण गायकीचे सप्तसूर सर्वसाधारण श्रोत्यांपर्यंत पोहोचविले. अनेक जणांना स्वरांचे वेड लावले. लयबद्धता आणि सुरेलता हा त्यांच्या गायकीचा स्थायीभाव होता. म्हणूनच त्याकाळी त्याचे नाव सर्वतोमुखी झाले होते.

मनोहरबुवा शिरगांवकरांचा ०६-०८-१९७८ रोजी स्वर्गवास झाल्यानंतर पुढच्या वर्षी गोवा सरकारने व कला अकादमीने मनोहरबुवांच्या आठवणीसाठी अखिल गोवा भजनस्पर्धा आयोजित केली ती आजपर्यंत चालू आहे आणि आता त्या स्पर्धेला अधिक लोकप्रियता मिळाली आहे.

मनोहरबुवा शिरगांवकर हे गोव्यातील एकमेवाद्वितीय असे अग्रणी भजनी कलाकार. त्यांनी गोव्यातल्या खेड्यापाड्यात भजनाची आवड निर्माण केली. नाटक ऐकताना आणि संगीत नाटक पाहताना जसा गोव्याचा रसिक भारावतो, त्याचप्रमाणे भजन ऐकताना आणि त्यात सहभागी होताना तेवढाच तल्लीन होतो.

थकल्या भागल्या जीवाला भजन संजीवनी देते. मनोहरबुवांनी भजने गायिली त्याचप्रमाणे त्यांनी भजने शिकविली म्हणजे एकप्रकारे त्यानी या देवभूमीत भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार केला. मनोहरबुवांनी गोव्यातल्या अशिक्षित समाजाला भजनाची गोडी लावली आणि अप्रत्यक्षरितीने साक्षरता प्रसाराचे महत्त्वाचे काम केले. मनोहरबुवा अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. ते उत्तम गायक, नट, हार्मोनियमवादक,

तबलावादक, पखवाजवादक त्याचप्रमाणे संगीत शिक्षक आणि संगीतकार व नाट्यदिग्दर्शक होते.

मनोहरबुवांचे खरे नाव गणेश. त्यांचा जन्म आजोळी, सत्तरी तालुक्यातील पिसुर्ले गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मुकुंद आणि आईचे नाव रुक्मिणी. मनोहरबुवांचे पूर्ण नाव गणेश मुकुंद शिरगांवकर. मनोहरबुवांच्या चुलत चुलत्याच्या वडिलांचे नाव गणेश होते व त्या गणेशाला गावात लोक सुकड्या ह्या टोपण नावाने हाक मारायचे. तेच नाव मनोहरबुवाना दिल्यामुळे त्यांना पण गांवातील मंडळी सुकड्या ह्याच नावाने हाक मारायचे. मनोहरबुवांची देहयष्टी उंच आणि हाडकुळी, त्यासाठी आपल्याला लोक सुकड्या म्हणतात, असे त्यांना वाटायचे. म्हणून कोणी नाव विचारले तर त्याना ते सुकड्या म्हणून सांगायचे. बुवांचे वय दहा बारा वर्षांचे होते तेव्हा ते गावात होतकरू गायक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा आवाज भरदार आणि लयींची उत्तम जाण असल्याने गावात कोणाकडेही भजन वा आरती असेल त्यावेळी त्यांना आग्रहाचे आमंत्रण असायचे.

१९२७-२८ साली म्हापसा शहरात मा. दीनानाथ मंगेशकर यांची बळवंत कंपनी नाटकाचे प्रयोग करण्यासाठी आली होती. त्याकाळी म्हापशात शिरगांवातला एक माणूस कै. वामन शिरगांवकर तबला दुरुस्तीचे काम करत होता व त्याचे संबंध बळवंत मंडळी नाटक कंपनीचे तबलजी वल्हेमामा बांदोडकर, मुळचे फोंडा तालुक्यातील नागेशी-बांदोडे येथील ह्यांच्याकडे होते. सहज बोलताना वामनरावानी वल्हेमामाकडे सुकड्याचा विषय काढला. आमच्या घराण्यात सुकडो नावाचा एक मुलगा आहे. त्याचा आवाज चांगला आहे, लय देखील चांगली आहे. तुमच्या कंपनीत वाढला तर चांगले शिकेल. वामनरावाने केलेली सुकड्याची स्तुती ऐकून वल्हेमामाने त्याना म्हापशाला बोलावून घेतले. सुकड्याला घेऊन वामनराव बळवंत कंपनीच्या बिऱ्हाडाला गेले. तेथे कंपनीच्या बुजुर्गासमोर सुकड्याला अभंग म्हणायला लावले. मनोहरबुवांचा सुरेलपणा व लयबद्धता त्यांना भावली. त्यानंतर सुकडो बळवंत कंपनीत दाखल झाले. बळवंत नाटक कंपनीत गोव्यातील अनेक बाल कलाकार काम करत होते. त्यानी या नवीन पोराला त्याचे नाव विचारले, त्याने आपले नाव सुकडो म्हणून सांगितले. हे ऐकून सगळी मुले त्याची मस्करी करू लागली. ही सगळी मस्करी सहन न झाल्यामुळे सुकडो रडायला लागला. सुदैवाने त्याचवेळी कंपनीत सहज फेरी मारता मारता पं. दीनानाथ मंगेशकर हे त्या ठिकाणी पोहचले. त्यांनी सुकड्याला रडताना पाहून कोंकणी भाषेत विचारले, 'कितें जालें रे, कित्याक रडटा? रडप बंद कर आनी कितें जालां तें सांग.' आपल्याच घरातला कोणीतरी मोठा माणूस आपली विचारपूस करतो असे सुकड्याला वाटले. दीनानाथरावानी सुकड्याची पाठ थोपटली आणि सांगितले. 'रडूं नाकां, रडप बंद कर आनी जे जालां ते भिंनासतना सांग.' सुकड्याने घडलेली सगळी

घटना म्हणजे आपल्या नावामुळे मुले आपली चेष्टा करतात, असे सांगितले.

ह्या सगळ्या प्रसंगाला नावाचे वेगळेपण हे कारण आहे, असे दीनानाथरावाना कळले. त्यांनी थोडा वेळ विचार केला. त्यानी त्यांच्या सहकाऱ्यांना साखर आणायला सांगितली आणि सगळ्यांना साखर वाट म्हणून सुकड्याला सांगितले आणि आपले नाव मनोहर आहे असे सांगून टाक असे ते म्हणाले. अशा पद्धतीने सुकड्या मुकूंद शिरगांवकरांचे नाव मनोहर मुकूंद शिरगांवकर असे झाले व त्याच नावाने ते प्रसिद्ध झाले.

**जीवनावर दृष्टिक्षेप**

- जन्म ०४ मार्च १९१३ सत्तरी तालुक्यातील पिसुर्ले गावांत.
- १९२७-२८ बळवंत नाट्यमंडळीत प्रवेश, त्याआधी शिरगावांत विविध नाटकात भूमिका. त्या अगोदर बाबय कासारपालकर यांच्या कंपनीत उमेदवारी.
- तबला शिक्षण भिवामामा नानोडकर यांच्याकडे.
- १९३३-३४ सखाराम, वेरे-बार्देश यांच्याकडे संगीत शिक्षण.
- १९३१-३२ दत्तू कासारपालकर यांच्या नाटक कंपनीत भूमिका.
- १९३५ शिरगांवच्या ग्रामस्थ कंपनीत ‘संत सखू’ नाटकात संत सखूची भूमिका. या भुमिकेमुळे भजनाची आवड निर्माण झाली.
- १९३४-३५ बाबा गावस यांच्या नावेलकर कंपनीत भूमिका.
- १९३५ च्या सुमारास सखारामबुवा बर्वे यांच्या प्रतिभा नाटक कंपनीत अभिनय.
- १९३७ डिचोली तालुक्यातील हळदणवाडी-मये येथे भजनाचे वर्ग सुरू केले.
- ५ जुलै १९५३ फोंडा तालुक्यात मेटवाडो-वळवय येथे भजन वर्गाचा शुभारंभ.
- १९६१ साली त्यांचा डिचोली तालुक्यातल्या वायंगिणी-मये येथील श्री खेतोबा देवळात गुरुवर्य सखारामबुवा बर्वे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
- नोव्हेंबर १९७६ मध्ये बांदोडा-फोंडा येथे झालेल्या अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत संमेलनात गोव्याचे तत्कालीन नायब राज्यपाल श्री. शिशिरकुमार बॅनर्जी यांच्या हस्ते त्यांचाजाहीर सत्कार करण्यात आला.
- ०६ ऑगस्ट १९७८ रोजी गोव्याच्या सरहद्दीवर असलेल्या महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्हातील दोडामार्ग येथे भजन शिकवणीसाठी गेले असता त्यांना स्वर्गवास झाला.

त्यांच्या मृत्यूची बातमी सर्वत्र पसरताच गोव्यातले तसेच महाराष्ट्र आणि कर्नाटकातील सीमेलपगतचे त्यांचे शिष्यगण, चाहत्यांनी शिरगांवची वाट धरली. त्यांचा मृतदेह शिरगांवात येईपर्यंत दिंडीसह भजनी सांप्रदायातले लोक संथ गतीने ‘जय जय रामकृष्ण हरी। श्रीराम जयराम जय जयराम।’ च्या नामघोषात शिरगावला पोहचले आणि हजारो लोकांच्या उपस्थितीत मनोहरबुवांची अंतिम यात्रा निघाली.

मनोहरबुवा शिरगांवकरांच्या भजनी पथकात जास्तकाळ सहभागी राहिलेले गोव्यातील नामवंत कलाकार म्हणजे नरहरी वळवईकर, बाबी नार्वेकर, अनंतमाम केरकर, नंदकुमार पर्वतकर, रामनाथ मठकर, दत्ताराम वळवईकर, मुकुंद मडकईकर, सोमनाथ च्यारी तसेच त्यांचे पुत्र नारायण (नाना) शिरगांवकर.

मनोहरबुवानी गोव्यातील मडगावातील प्रसिद्ध दामोदर दिंडी उत्सवात आणि वास्को येथील दामोदर दिंडी उत्सवात अनेक वर्षे भजन बैठकीत सहभाग दिला होता.

शिरगांवात १९५७ साली सुरू झालेल्या पालखी उत्सवात म्हणजे लईराईच्या दिंडी उत्सवात त्यांचा खूप मोठा वाटा होता.

अशा या थोर भजनी कलाकाराच्या योगदानाची दखल घेऊन, त्यांच्या स्मरणार्थ गोवा सरकारने अखिल गोवा भजन स्पर्धा तसेच हल्लीच सांखळी येथे गोवा सरकारने बांधलेल्या रवीन्द्र भवनाच्या मुख्य सभागृहाला भजनसम्राट मनोहरबुवा शिरगांवकर असे नाव देवून त्याची स्मृती जागती ठेवली..

भजनसम्राट कै. मनोहरबुवा शिरगांवकर यांच्या पावलांवर पाऊल टाकून भजन क्षेत्रात काम केलेल्या त्यांच्या मोठ्या मुलाचा कै. नारायण (नाना) मनोहर शिरगांवकर यांचा देखील गोवा सरकारने १९९४-९५ वर्षीचा गोवा राज्य सांस्कृतिक पुरस्कार देऊन सन्मान केला होता. तसेच त्यांच्या मृत्यूनंतर गोवा विद्यापीठात त्यांच्या नावाने कै. नारायण (नाना) मनोहर शिरगावकर अद्यासन, गोव्याचे माजी मुख्यमंत्री कै. मा. मनोहरभाई पर्रीकर यांनी सुरू केले आहे.

गोवा मुक्तीनंतर सुमारे दीड-दोन वर्षांनी जेव्हा पणजी आकाशवाणीवर गोव्यातल्या ठराविक कलाकारांचे कार्यक्रम प्रसारीत व्हायला लागले, तेव्हा म्हणजे १९६२-६३ च्या सुमारास कै. मनोहरबुवा शिरगांवकर यांचे कार्यक्रम अग्रक्रमाने होत असत.

सर्वसाधारण लोकांपर्यंत संगीत कला पोहचण्यासाठी जसे पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी देखील भजन गायनाचे माध्यम वापरले, त्याच स्वरूपाचे काम मर्यादित स्वरूपात गोव्यापुरते मनोहरबुवा शिरगांवकर यांनी केले, असे म्हणायला काहीच हरकत नाही. नादब्रह्माच्या या खऱ्या उपासकाने भजनी गायकीच्या माध्यमातून गोव्याच्या कानाकोपऱ्यात सप्तसूरातील जादू खेड्यापाड्यांत पोचवली व त्यांच्या कानांना स्वरानंद घेण्याची संधी दिली.

कै. मनोहरबुवांच्या भजन परंपरेचा वारसा त्यांचे धाकटे सुपूत्र श्री. गुरुदास शिरगावकर हे आज चालवत आहेत. 'मनोहारी भजन संस्थे'ची स्थापना करून ते मार्गदर्शन करत आहेत.



**श्री. जितेंद्र नारायण शिरगांवकर**
**मोबाईल : ९७२०९७३९६५**

# WHY SHOULD I VOTE?

Somewhere inside of all the people has the power to change the country and vote is one of that power. The word vote means to express our choice, opinion and to make a collective decision of any citizen that enables us to choose the leaders of tomorrow. Right to vote is our fundamental right and its our responsibility to choose a good leader for our country who will fulfil basic needs and desires of people.

Voting is the most important part of our democratic Government. But unfortunately many people of our country are not participating in voting process. Some of the reasons behind poor participation are like people do not have enough knowledge or information about the candidates and also about the voting process, some other people believe that their one vote cannot make a difference, but if 100 people keep the same thought and do not vote it means that 100 votes are wasted. If we are not voting in elections then it means we are not utilising our rights properly and we will not get a chance to choose our leaders.

I should vote because we are formulate enough to live in a country where almost anyone can vote above 18 years of age where the sex, race, caste, religion doesn't matter and almost anyone can run to become an elected official Now the supreme court of India has also give us another option along with the candidates who are contesting elections called NOTA, NOTA stands for None of The Above. This allows any voter to register a vote of rejection which means the person who is registering his vote has not chosen any of the candidate who are contesting election. If I don't vote then it means I am giving my right to vote and right to choose Government. The only way to change things which we do not like in government is by giving vote for some person who has the interest, willingness and spirit to change the issue that the people are facing.

There are many benifits of one vote as it can choose a good leader which will lead to formation of a better government which in form will make development and provide good facilities to citizens of country. One vote can change many things, just by one vote a genuinely interested person who has a good thinking ability, good leadership skills can become leader and also because of one vote

a person with narrow, compt mind and selfishness can become a leader which will keep our country underdeveloped.

Elections builds up strong connections with family members, neighbours and society. The strongest social connection can lead to a good quality of life. It also improves our democratic rule in our country. Voting is a form of personal empowerment giving individuals a chance to raise their voice and give their opinions. Our vote is a representation of our voice.

Voting is a transfer of power from people to few person who are excellent leaders so that they can use the power to lead the nation to great heights. If I vote a wrong candidate he might come over and spoil the system or he may not be strong energy to form a strong and stable government which in turn will not lead to a stable nation. When a good leader is chosen he will work for betterment of people and country.

Everyone has a right to choose whom he want as a leader because his standard of living, rights, liberties will depend on who he will choose. So we all should utilise our right to vote as one vote can make a difference.



Article By :

**Omkar Rajendra Devidas**

Verlem, Netravalim, Sanguem

3rd place in college level

(State level essay competition in 25th January National voters day 2020 organised by Chief Eecoral Officer, Goa)

## निवेदन

गोमंतक मराठा समाज, गोवा संचालित

**कै. नारायण मराठे कारवारकर स्मृती सेवा केंद्र**

दि. १२ मार्च २०२२, रोजी मळा-पणजी

येथे उद्‌घाटन सोहळा निश्चित केला आहे.

कृपया समाज बांधवानी याची नोंद घ्यावी.

# शशिकलाताई यांची ८७ वी जयंती




**गोमंतक मराठा समाजाच्या स्नेहमेळाव्यात शशिकलाताई काकोडकर स्मृती उत्कृष्ट कार्यकर्त्या पुरस्काराच्या मानकरी पौर्णिमा केरकर व डॉ. अनुपमा बोरकर यांच्यासमवेत प्रा. मनोज कामत, यतिन काकोडकर, मंगेश कुंडईकर, व इतर पदाधिकारी.**

गोमंतक मराठा समाजातील घटकांनी सरस्वतीची, कलेची, ज्ञानाची निष्ठेने सेवा केली आहे. महात्मा फुलेंच्या तोडीचे कार्य राजाराम पैंगिणकर यांनी केले आहे. सर्जनशिलता, चिंतनशिलता, क्रियाशिलता या समाजाने जोपासली आहे. इतर ज्ञातीतील कर्तृत्वाचाही गौरव करण्याची या समाजाची वृत्ती आदर्शवत आहे, असे गौरवोद्गार काढून मल्लिकार्जुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज कामत यांनी, शशिकलाताई काकोडकर यांच्यानंतर समाजप्रतीचे दायित्व, ममत्व कुठल्याही राजकारण्यात आढळले नाही, असे मत येथे व्यक्त केले.

गोमंतक मराठा समाज गोवा या संस्थेतर्फे गोव्याच्या पहिल्या मुख्यमंत्री शशिकलाताई काकोडकर यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त संस्थेच्या राजाराम पैंगिणकर सभागृहात झालेल्या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. कामत बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे मुंबईतीतील चेंबूरचे आमदार प्रकाश वैकुंठ फातर्पेकर,सन्म ाननीय पाहुणे

उद्योजक तथा गोवा इंटरनॅशनल सेंटरचे अध्यक्ष यतिन काकोडकर, संस्थेचे सचिव मंगेश कुंडईकर, कोषाध्यक्ष श्रीकृष्ण आसकावकर, कार्यकारी सदस्य सतीश पैंगिणकर उपस्थित होते.

यावेळी यतिन काकोडकर यांच्या हस्ते, शशिकलाताई स्मृती उत्कृष्ट सम ाज कार्यकर्त्या पुरस्काराच्या मानकरी पौर्णिमा केरकर व डॉ. अनुपमा बोरकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**शशिकलाताईंकडे दूरदृष्टी होती : मनोज कामत**

शशिकलाताई यांचा रोखठोकपणा, करारी बाणा, शिस्तप्रियता आणि तेवढीच संवेदनशिलता, वाचनाची भूक हे गुण मला भावले. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांना समाजाच्या कोंदणात बंदीस्त करता येणार नाही.आजच्या राजकीय स्थितीत ताईंची उणीव प्रकर्षाने जाणवते, असे डॉ. मनोज कामत यांनी सांगितले.




**आमदार प्रकाश फातर्पेकर व इतर मान्यवरांसमवेत गोमंतक मराठा समाजातर्फे देण्यात आलेल्या विविध पुरस्कारांचे मानकरी.**

डॉ. अनुपमा म्हणाल्या, मी फार मोठं कार्य केले आहे असे मला वाटत नाही तेव्हा या पुरस्काराची मला अपेक्षा नव्हती, म्हणून हा पुरस्कार मी मला मिळालेला आशीर्वाद समजून स्वीकारते. पौर्णिमा केरकर यांनी सांगितले, की गोमंतक मराठा समाजाच्या घटकांनी अनेक क्षेत्रात ललामभूत ठरेल असे कार्य केले आहे. ताईंच्या नावाचा हा पुरस्कार मिळणे हे मी माझे भाग्यच समजते.

अधिक काम करण्याचे बळ या पुरस्कारामुळे निश्चितच मिळेल. 'विस्मृतीच्या उंबरठ्यावर' हे माझे सदर वाचून ताई कौतुक करायच्या व पुस्तक काढण्यासाठी आग्रही त्यांनी केला होता.

गोमंतकीय सुपूत्र व महाराष्ट्र राज्याचे आमदार प्रकाश फातर्पेकर म्हणाले, मी चेंबूरचा आमदार असलो तरी संपूर्ण महाराष्ट्रातील कामे करतो.मी कुणाचाही फोन स्वतः घेतो, पीएला घ्यायला सांगत नाही .माझ्या कार्यालयाची दारे नेहमी उघडी असतात.अशी माझी कामाची पध्दत आहे. मेधा पाटकर या माझ्या मानस भगिनी .त्यांच्याकडून मी समाजकार्याची प्रेरणा घेतली. समाजाला माझी गरज पडली तर मला कधीही हाक मारावी.

मंगेश कुंडईकर यांनी प्रास्ताविक केले.मान्यवरांनी समई प्रज्वलित करून म ेळाव्याचे उद्घाटन केले व शशिकलातताईंच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली. सुनील शिवा नाईक यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्मीकांत नाईक यांनी आभार मानले. ॲड. हर्षा नाईक यांनी पुरस्कार प्राप्त महिलांचा परिचय करून दिला. या सोहळ्यात २०१८-१९ व २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

## विविध पुरस्कारांचे मानकरी

समाजाच्या विविध पुरस्कारांच्या मानकऱ्यांना यावेळी आमदार फातर्पेकर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यात नरेंद्र नाईक, वास्को( कै. विश्वनाथ पैंगिणकर स्मृती उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार), ज्योती रामराव नागेशकर, नागेशी (कै.




**उत्कृष्ट तालुका प्रथम पुरस्कार स्विकारताना पेडणे तालुका समिती.**

निलिमा पैंगिणकर उत्कृष्ट कार्यकर्ती पुरस्कार), अविनाश रामनाथकर, रामनाथी (तातोबा वेलिंगकर स्मृती नाट्य व कला क्षेत्रातील उत्कृष्ट पुरुष कलाकार पुरस्कार), सरोजनी लोलयेकर(अलकताई वेलिंगकर स्मृती, नाट्य व कला क्षेत्रातील उत्कृष्ट महिला कलाकार पुरस्कार), प्रा. दत्ता भि. नाईक (स्व. प्रमिलाबाई नारायण मराठे कारवारकर स्मृती,दीर्घ विद्यादान सेवेबद्दल सेवा सदन प्राध्यापक पुरस्कार), सन्मित्र भरत नाईक व राजदीप सुनील फातर्पेकर (विशेष प्राविण्याबद्दल विद्यार्थी पुरस्कार), महादेव विनायक नाईक (प्रगतिशील कृषी पुरस्कार),साईश अनंत नाईक (युवा नाट्यकलाकार पुरस्कार) व मिलिंद पिळगावकर(उत्कृष्ट उद्योजक पुरस्कार) याचा समावेश होता.




**उत्कृष्ट तालुका द्वितीय पुरस्कार स्विकारताना सांगे तालुका समिती.**

तसेच उत्कृष्ट तालुका स्तरावरील समाज कार्य (पुरुष समिती) प्रथम पुरस्कार (कै. सुधा सुभाष साळकर स्मरणार्थ फिरता चषक) - पेडणे तालुका समितीला प्राप्त झाला. तर उत्कृष्ट तालुका स्तरावरील समाज कार्य (पुरुष समिती) - द्वितीय पुरस्कार (कै. सौ. गिरिजाबाई व कै. शंकर गुणा नाईक स्मृती फिरता चषक) - सांगे तालुका समितीला प्राप्त झाला.

## केंद्रिय समिती व केंद्रिय महिला समितीतर्फे आयोजित वधुवर मेळावा



**मेळाव्याचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुण्या श्रीमती अश्विनी लामगांवकर.**

गोमंतक मराठा समाज, केंद्रिय समिती व महिला समितीने मिळून दि. ३-१२-२०२१ रोजी आपल्या समाजाच्या मुला-मुलींसाठी वधु-वर मेळाव्याचे आयोजन केले होते. सदर मेळावा पणजी येथे राजाराम स्मृती सभागृहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून शिक्षिका श्रीमती अश्विनी लामगांवकर उपस्थित होत्या. समई प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी केंद्रीय समितीचे अध्यक्ष - आनंद वाघुर्मेकर, सचिव - मंगेश कुंडईकर, खजिनदार - श्रीकृष्ण आसकावकर व्यासपीठावर उपस्थित होते.

वधु-वर मेळाव्याचे आयोजन करून आपल्या समाजातील मुलां-मुलींचे विवाह जुळवण्याचे प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या सुंदर कार्यक्रमास आपल्याला प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित केल्याबद्दल श्रीमती अश्विनी लामगावकर यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अध्यक्ष - श्री. वाघुर्मेकर यांनी केले. महिला समितीचा हा कार्यक्रम असून त्यांनी तो व्यवस्थितरित्या आयोजित केल्याबद्दल अध्यक्षानी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - सौ. मनिषा नाईक यांनी केले तर आभार सौ. मिलन कामुलकर यांनी मानले.




**मेळाव्यात व्यासपीठावर उपस्थित केंद्रिय समिती समवेत केंद्रिय महिला समिती पदाधिकारी व अन्य.**

# संजीव वेरेकर लिखित 'प्रेरणा रुख' पुस्तकाचा लोकार्पण सोहळा संपन्न




**संजीव वेरेकर यांच्या 'प्रेरणा रुख' पुस्तकाचे विमोचन करताना ॲड. उदय भेंब्रे, पांडुरंग नाडकर्णी, सुभाष जाण व केंद्रिय समितीचे पदाधिकारी.**

गोमंतक मराठा समाज, गोवातर्फे ७ नोव्हेंबर २०२१ रोजी राजाराम स्मृती सभागृहात श्री. संजीव वेरेकर यांनी लिहिलेल्या 'प्रेरणा रुख' (कर्तृत्व चित्रण) ग्रंथाचा लोकार्पण कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक तथा विचारवंत ॲड. उदय भेंब्रे व कार्यक्रमाचे अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ श्री. पांडुरंग नाडकर्णी उपस्थित होते.

समाजाचा शंभर वर्षापूर्वीचा संघर्षमय व सकारात्मक क्रांती चळवळीचा इतिहास तसेच गोवा मुक्तीपूर्वी व नंतरच्या काळातही समाजातील निवडक अशा प्रतिभावंतांनी प्रदेश, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव जातीला दिलेल्या योगदानाचे व त्यांच्या कर्तृत्वाचे चित्रण लेखकाने आपल्या शैलीत मांडले असल्याचे अध्यक्ष आनंद वाघुर्मेकर यांनी सांगितले.

'ह्या पुस्तकाच्या माध्यमातून, आपल्या समाजातील थोर विद्वान तसेच गोमंतक मराठा समाजाचे अध्वर्यु राजाराम रंगाजी पैंगींणकर, गोव्याचे आगरकर नारायण मराठे कारवारकर, गोव्याचे भाग्यविधाते पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर, पहिल्या महिला मुख्यमंत्री शशिकलाताई काकोडकर, पोर्तुगीज

भाषेचे अनुवादक, समाज सेवक राजाराम कपिलेश्वरकर, समाज प्रकल्पाचे शिल्पकार बाबन नाईक, तत्वनिष्ठ पुढारी सुलोचनाताई काटकर, समाज सेवक डॉ. रामकृष्ण मोरजकर, मुक्तीपूर्व काळात शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या शिक्षिका पार्वतीबाई वेरेकर, समाज सुधारणा चळवळीचे सूत्रधार डॉ. शामराव मुळगावकर, जागतिक कीर्तीचे प्रसूतीशास्त्र संशोधक तज्ज्ञ डॉ. विठ्ठलराव शेरोडकर, देशाच्या औद्योगिक जगतातले आदर्श सुमंत मुळगांवकर, देशातल्या रक्तदान चळवळीच्या अध्वर्यु लीला मुळगांवकर, ९ वे हवाईदल प्रमुख, एअर चिफ मार्शल ह्षिकेश मुळगांवकर, पर्यटन व्यवसायाचे शिल्पकार बॅरीस्टर अजीत केरकर, महान चित्रकार विश्वनाथ नागेशकर, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे पहिले भारतीय उपसंचालक अर्थतज्ज्ञ प्रभाकर नावेलकर, भारतीय बौद्धिक संपदेचे उद्‌गाते शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, गोव्यातील आर. सी. सी. तज्ज्ञ व प्राचीन मंदिर बांधकाम अभ्यासक इंजिनिअर रमेश वेरेकर, संस्कृत भाषा प्रसारक अशोक बाणस्तारकर, डॉ. श्रीपाद वाघुर्मेकर, गोव्याचे माजी संघ चालक व शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य प्राचार्य सुभाष भास्कर वेलिंगकर या व्यक्तिमत्वाच्या कर्तृत्व चित्रणांचा या ग्रंथात समावेश असल्याची माहिती लेखकाने दिली.

असा इतिहास अन्य समाजातील थोर व्यक्तींवर आधारित लेख स्वरुपातील दस्ताऐवज सांभाळण्यात यावा व त्याची शिकवण या समाजाकडून घ्यावी असे आवाहन प्रमुख पाहुणे उदय भेंब्रे यांनी यावेळी व्यक्त केले.

गोमंतक मराठा समाजात एवढ्याच थोर पुरुषांची गणती नसून अजुनही व्यक्तींचा यात समाविष्ट करण्यात यावा अशी सुचनाही त्यांनी केली.

# सुविचार



‘‘आपण एकटे असलो तरी हरकत नाही. आपल्यामागे कुणी येवो ना येवो. जे आपल्याला करावंस वाटतं ते करण्यातच आपल्या जीवनाची सार्थकता आहे.’’

**– वीर सावरकर**



**नुतन केंद्रिय युवा आणि केंद्रिय महिला समिती समवेत केंद्रिय समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी.**

## केंद्रिय युवा समिती

अध्यक्ष ...........हर्षराज बाणस्तारकर

उपाध्यक्ष .............दीक्षा रामनाथकर

सचिव .................... राधा नाईक

सं. सचिव ............ शुभम वाघुर्मेकर

खजिनदार ................ दिप्तेश नाईक

सदस्य ..............शिवम् आमोणकर

सदस्य ................ अक्षय मायरेकर

सदस्य ................ सुहानी देविदास

सदस्य ................. सुवर्णा बांदेकर

सदस्य ...................सोनल नाईक

सदस्य ..............सिद्धेश साकोर्डेकर

सदस्य .................... हर्ष नार्वेकर

सदस्य ............ सन्मान पिळगांवकर

सदस्य ........... साईराज पिळगांवकर

सदस्य .............. अर्चना कामुलकर

सदस्य .................विशांत मांद्रेकर

सदस्य .............. जुगल लोलयेंकर

## केंद्रिय महिला समिती

अध्यक्षा........ सौ. शुभदा कळंगुटकर

उपाध्यक्षा ...........सौ. मनिषा नाईक

सचिव ..........सौ. मिलन कामुलकर

सं. सचिव ..........सौ. शितल नाईक

खजिनदार .......सौ. शिला काकोडकर

सदस्या..............सौ. सरोजा नाईक

सदस्या................सौ. श्रद्धा नाईक

सदस्या............सौ. शुभांगी नार्वेकर

सदस्या........... सौ. सुनिता पेडणेकर

सदस्या...............सौ. पद्मा नाईक

सदस्या........ सौ. शरयू कोलवाळकर

सदस्या........सौ. तन्वी जांबावलीकर

सदस्या............ सौ. दिव्या देविदास

सदस्या................सौ. रेखा नाईक

कार्यक्रम संयोजक सौ. रंगिता वाघुर्मेकर

# तालुकास्तरीय विविध स्पर्धा/कार्यक्रम

## डिचोली तालुका



**डिचोली तालुका ओबीसी मेळाव्याचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना मान्यवर.**

**१) ओबीसी स्नेहमेळावा :**

गो. म. समाज, डिचोली तालुका समितीचे दि. २८-११-२०२१ रोजी, साखळी येथील डॅलमन सभागृहात दुपारी ३.०० वाजता ओबीसी दर्जाकरिता खास स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय समितीचे अध्यक्ष, सचिव व खजिनदारासमवेत इतर पदाधिकारीही उपस्थित होते. सदर मेळावा हा साखळी मतदार संघातून, खास ओबीसी साठी आयोजित केला होता.

गोमंतक मराठा समाजाला राखीवतेच्या दर्जाची आवश्यकतेची गरज का व कधीपासून भासली हे अध्यक्ष आनंद वाघुर्मेकर तसेच सचिव मंगेश कुंडईकर यांनी सांगितले.

'शिक्षण' संस्थेत राखीवतेमुळे आपल्या विद्यार्थी गटाचे फार मोठे नुकसान होतानाचे दृष्य दिसून येत असल्याने राखीवता नसल्यामुळे कुवत असूनही योग्य अभ्यासक्रम निवडता येत नसल्यामुळे विद्यार्थी वर्गात नाराजी व नैराश्य दिसून येत आहे याविषयी उहापोह झाला.

राखीवता दर्ज्यासाठी २०१३ सालपासून सरकार दरबारी अर्ज सादर करून आता जवळ जवळ ८ वर्षे पूर्ण झाली. यादरम्यान ओबीसी कमिशन खात्यातर्फे

फक्त एकच सुनावणी झाली व त्यानंतर विषय ठप्पच राहिला. २०१३ ते आजपर्यंत प्रत्येक आमदार व मंत्रीमहोदय यांच्या पायऱ्या आपल्या समिती व बांधवानी झिजवल्या, परंतु पुरेसा राजकीय दबाव व प्रभाव नसल्यामुळे आमची राखीवतेची मागणी काही मान्य करण्यात आलेली नाही. तेव्हा निवडणूक प्रचारासाठी आपल्या दारी येणाऱ्या नेत्यांकडे राखीवतेची मागणी मांडा, त्यांना याची जाणीव करून द्या व गरज पडल्यास आंदोलन केले जाईल, हे ही सांगा.

राखीवतेच्या दर्जासाठी न्यायालयाची पायरी हा सर्वात शेवटचा पर्याय असेल. त्यापूर्वी राजकीय दबावाने प्रयत्न करून पाहण्यात यावे असे अध्यक्ष म्हणाले.

सभासदांनी मोठ्याप्रमाणात बैठकीस हजेरी लावून मेळावा यशस्वी केल्याबद्दल श्री. जितेंद्र शिरगांवकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## धारबांदोडा तालुका



**धारबांदोडा तालुका महिला समिती आयोजित पाककला व राखी बनविणे स्पर्धेतील स्पर्धकासमवेत, समिती सदस्य व पदाधिकारी.**

### पाककला स्पर्धेतील विजेत्या :

१) प्रथम - कु. दिक्षा गावकर, २, द्वितीय - सौ. राधा देविदास, ३) तृतीय - सौ. आर्या देविदास.

### राखी बनविणे स्पर्धेतील विजेत्या :

१) प्रथम - कु. मनिषा गोसावी, २) द्वितीय - सौ. माही देविदास, ३) तृतीय - सौ. सान्वी देविदास.

## फोंडा तालुका

# १) फोंडा तालुका महिला समितीतर्फे स्वच्छता अभियान कार्यक्रम



**मंगेशी येथील मंदिर परिसर स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या फोंडा तालुका महिला समितीच्या सदस्या.**

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती दिनी गोमंतक मराठा समाज महिला समितीतर्फे मंगेशी येथील श्री मंगेश मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात फोंडा तालुका महिला समितीच्या सर्व सदस्यांनी भाग घेऊन संपूर्ण परिसर स्वच्छ केला. यावेळी समितीतर्फे स्वच्छता अभियानात अध्यक्ष ज्योती नागेशकर व रंगिता वाघुर्मेकर यानी महिला सदस्यांना मार्गदर्शन केले. वर्धा वेरेकर, नताशा नाईक, खुशी नाईक, ज्योती नाईक, अनुराधा म्हार्दोळकर, उवर्शी रामनाथकर, ज्योती रामनाथकर, जयमाला कवळेकर, अपर्णा रामनाथकर, अलका कामुलकर, एकता कामुलकर, संतोष रामनाथकर यांनी भाग घेतला. सर्व सदस्यांचे गोमंतक मराठा समाज फोंडा तालुक्याचे अध्यक्ष रितेश नार्वेकर यांनी अभिनंदन केले.

# २) आरोग्य शिबीर



**फोंडा तालुका महिलासमितीतर्फे दि. ७-११-२०२१ रोजी महिलांच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती देताना डॉ. पूर्वा सहकारी व उपस्थित महिला वर्ग.**

## ३) इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर



गोमंतक मराठा समाजाची केंद्रिय महिला समितीने फोंडा, बार्देश, केपे, सत्तरी, सांगे, काणकोण, धारबांदोडा आणि सालसेत तालुका समितीच्या सहकार्याने इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी खास मार्गदर्शन शिबीर दि. ७ नोव्हेंबर रोजी दु. १२ ते ५.३० यावेळेत थ्रिफ्ट हॉल, फोंडा येथे आयोजित केले होते. श्री. आत्माराम गांवकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नवीन शिक्षण पद्धतीच्या नियमावलीनुसार प्रश्नपत्रिका कशी सोडवावी यासंबंधिचे मार्गदर्शन करण्यात आले. ह्या शिबिराचा उपयोग विद्यार्थ्यांना दहावीच्या परिक्षेत उत्तम गुण मिळवण्याकरिता व्हावा या हेतूने आयोजन केले होते असे कार्यक्रमाच्या संजयोजिका रंगीता वाघुर्मेकर यांनी सांगितले. यावेळी केंद्रीय समितीचे अध्यक्ष आनंद वाघुर्मेकर व खजिनदार श्रीकृष्ण आस्कांवरकर उपस्थित होते.

## ४) शिक्षक दिनी कार्यक्रम



**शिक्षक दिना निमित्त नविन शैक्षणीक पद्धत २०२० कार्यपद्धतीवर खास शिक्षक वर्गासाठी कार्यशाळेचे आयोजन फोंडा ता. महिला समितीतर्फे दि. ९-१०-२०२१ रोजी डॉ. नारायण देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थित शिक्षक वर्ग व मान्यवर.**

# ५) इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन



**मार्गदर्शन करताना शिक्षक व उपस्थित विद्यार्थी.**

फोंडा तालुका महिला समितीतर्फे, इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांकिरता ट्युशन घेण्यात येत होते. सदर ट्युशन ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले होते. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यापासून प्रत्यक्षरित्या मार्गदर्शन करण्यात येत आहे. सदर सेवा ही मोफत असून ह्या योजनेसाठी आपल्या समाजातील शिक्षकांनी आपला मोलाचा वेळ देऊन ही सेवा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात आली. श्री. अरविंद वाडीकर (इतिहास), सौ. मिता केदार नाईक (इंग्लिश), सौ. रंगिता आनंद वाघुर्मेकर (भुगोल), सौ. श्रेया मंगेशकर (गणित) व श्री. नित्यानंद नागेशकर (विज्ञान) ह्या शिक्षकांनी सदर ट्युशन देण्यातत मदत केली. त्याबद्दल समितीतर्फे त्यांचे आभार मानण्यात आले.



**फोंडा तालुका महिला समितीतर्फे विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना शिक्षक व उपस्थित विद्यार्थी.**

## तिसवाडी तालुका

## १) जीवन कृतज्ञता सन्मान

गोवा राज्य स्वतंत्र होवून ६० वर्षे झाली आणि हा ६० वा वर्धापनदिन १९ डिसेंबर रोजी सगळीकडे उत्साहत साजरा करण्यात आला. यानिमित्ताने गोमंतक मराठा समाज तिसवाडी तालुका समितीतर्फे तालुक्यातील ज्येष्ठ समाज बांधव आणि भगिनींना आजी आजोबा ह्या संकल्पनेवर आधारित जीवन कृतज्ञता सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले आणि त्याची सुरुवात १५ डिसेंबर पासून करण्यात आली. या साठी कुंभारजुवा, करमळी, मळा, सांतिईनेज, भाटले-ताळगांव येथील सहा जोड्या निवडण्यात आल्या आहेत. १५ डिसेंबर रोजी भाटले येथील जेष्ठ समाज बांधव आजोबा श्री सुरेंद्र काकोडकर आणि आजी



**श्री व सौ. सुप्रिया सुरेंद्र काकोडकर, मळा-पणजी.**



**श्री. व सौ. विजया श्रीकंठ नाईक, आमराल बांध-ताळगांव.**




श्री. व सौ. शैला शिवनाथ आमोणकर, मळा-पणजी.



श्री. व सौ. सुषमा रोहिदास नाईक, बोरभाट-ताळगांव.

सौ. सुप्रिया काकोडकर तसेच मळा पणजी येथील आजोबा श्री. शिवनाथ आमोणकर व आजी सौ. शैला आमोणकर या उभयतांच्या सन्मानाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रत्येक कुटुंबाच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्याशी संवाद साधत त्यांच्याशी गप्पा गोष्टी करत त्यांच्या भूतकाळातील अविस्मरणीय घटना व आठवणीना उजाळा देण्यात आला आणि अशा सुखद वातावरणात या सुखी दांपत्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

जीवन कृतज्ञता सन्मान पुरस्कारासाठी निवडण्यात आलेल्या पुढील जोड्या अश्या आहेत. श्री. व सौ. उज्वला गजानन रायकर - कुंभारजुवा, श्री. व सौ. कविता कालीदास नाईक - करमळी, असे तालुका समितीने कळविले आहे.

## २) तिसवाडी तालुका समितीतर्फे दिपोत्सव साजरा

गोमंतक मराठा समाज, तिसवाडी तालुका समितीने दीपोत्सवानिमीत्त १४ नोव्हेंबर २०२१ रोजी तालुका पातळीवर आकाश कंदील स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत आठ स्पर्धकांनी भाग घेतला होता. सदर सोहळ्यास ज्येष्ठ समाज बांधव श्री. रोहिदास नाईक, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सर्व प्रथम समितीचे सचिव श्री. प्रशांत माशेलकर यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षा सौ. सुनीता पेडणेकर यांनी प्रमुख अतिथी व सभागृहातील उपस्थितांचे स्वागत केले. सचिव श्री प्रशांत माशेलकर यानी आकाश कंदील स्पर्धेचा निकाल जाहीर केला. पहिले बक्षीस, सौ. वंदना नाईक, दुसरे-रिमा सदानंद खांडोळकर व तिसरे -पुनम खांडेपारकर आणि उत्तेजनार्थ-नमिशा खांडेपारकर यांना प्राप्त झाले. सर्व विजेत्यांना प्रमुख अतिथीच्या हस्ते रोख रक्कमेची बक्षीसे देवून गौरविण्यात आले. त्याचबरोबर बालदीन असल्या मुळे दोन लहान मुलांनी पं. जवाहरलाल नेहरू (चाचा-नेहरू) यांच्या वेषात उपस्थिती लावल्याने, त्यांची प्रशंसा करून आणि त्याना बक्षिसे देवून कौतुक करण्यात आले. प्रमुख अतिथी रोहिदास नाईक यांनी सर्व स्पर्धकांचे अभिनंदन केले व पारंपरिक आकाश कंदीलाचे महत्व विषद केले. समितीचे उपाध्यक्ष श्री नरेश आमोणकर यांनी सोहळ्याचे आयोजन केल्या बद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. सचिव श्री प्रशांत माशेलकर यानी सूत्रसंचालन केले तर खजिनदार सौ. श्रध्दा नाईक यांनी आभार व्यक्त केले.




**तिसवाडी तालुका समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या आकाशकंदिल स्पर्धेत सहभागी झालेले स्पर्धेक व इतर मान्यवर.**

## केपे तालुका

# दिवाळी विशेष स्पर्धा

केपे तालुका समितीतर्फे दि. १३-११-२०२१ रोजी दिवाळी विशेषांक, गोमंतकीय पारंपारिक गोड पदार्थ बनविणे स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आयोजित करम्यात आली होती. सदर स्पर्धेचे बक्षीस वितरण दि. ७-१-२०२२ रोजी उदय बाळ्ळीकर यांच्या निवासस्थानी करण्यात आले. यावेळी श्री. विलास बाळ्ळीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. मंगेश देविदास यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्री. ज्ञानेश्वर मळकर्णेकर यांनी आभार मानले.



**केपे तालुका समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेले स्पर्धेक व इतर मान्यवर.**

### स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे

**रांगोळी (१८ वर्षांखालील गट)** : १) सीली काकोडकर - प्रथम, २) दीक्षिता मळकर्णेकर - द्वितीय, ३) कनिष्का जोतकर - तृतीय, ४) भुमिका देविदास - तृतीय. **रांगोळी (१८ वर्षा वरील गट)** : १) वर्षा फातर्पेकर - प्रथम, २) गौरांगी फातर्पेकर - द्वितीय, अविक्षा फातर्पेकर - तृतीय. **गोड पदार्थ बनविणे स्पर्धा** : १) श्रृती फातर्पेकर - प्रथम, २) शरद मळकर्णेकर - द्वितीय, ३) साधना देविदास - तृतीय. **चित्रकला स्पर्धा** : १) सानिका देविदास - प्रथम, २) प्रज्योत पर्वतकर - द्वितीय, ३) अमनेश फातर्पेकर - तृतीय, ४) भुमिका देविदास - तृतीय.

# सालसेत तालुका

## सालसेत तालुका समितीतर्फे 'तारका पुंज'



**मडगाव येथील तारकापुंज कार्यक्रमात सत्कारमूर्ती सरोज उदेकर व स्पर्धा विजेत्यांबरोबर सालसेत तालुका महिला समिती.**

गोमंतक मराठा समाजाच्या सालसेत तालुका महिला समिती आयोजित तारकापुंज कार्यक्रमात विविध स्पर्धा झाल्या. यामध्ये खास मुलांसाठी निबंध स्पर्धा, महिलांसाठी मेहंदी स्पर्धा व पाककला स्पर्दा (पौष्टिक लाडू) आयोजित करण्यात आल्या.

बक्षीस वितरण समारंभ नावेली मडगाव येथील सॅबेतिना सभागृहात झाला. कार्यक्रमात ज्येष्ठ शिक्षिका सरोज संतोष ऊदेवकर यांचा मानपत्र, शाल, श्रीफळ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. विविध स्पर्दाचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, स्वागत अध्यक्षा शिल्पा बोरकर यांनी केले.

पाहुण्यांची ओळख निषिता नाईक यांनी करून पुष्पगुच्छ प्रदान करण्यात आले. प्रमुख पाहुण्या वर्षा नाईक यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

**मेहंदी स्पर्धा निकाल** : प्रथम – नेही विर्डीकर, द्वितीय – मानसी लोलयेकर, तृतिय – गार्गी शिरोडकर, पाककला स्पर्धा प्रथम – भारती तलवडकर, द्वितीय – प्रज्ञा पाटील, तृतीय – शिला काकोडकर यांना प्रमुख पाहुणे वर्षा नाईक, युवा समिती अध्यक्ष बाणस्तारकर यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता वाघुर्मेकर यांनी केले. सरिता लोलयेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास केंद्रीय समिती व सालसेत तालुका समिती उपस्थित होते.

**निबंध स्पर्धेचे विजेते** : प्रथम – शिवम अवधूत तलवडकर, द्वितीय – शिवम शशी गावकर, तृतीय – रविराज विनोद पंडित, उत्तेजनार्थ – कुणाल प्रकाश नाईक, वेदांत शरद देसाई.

# स्व. शशिकलाताई काकोडकर पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली



केंद्रिय समितीतर्फे श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.




फोंडा तालुका समितीतर्फे श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.




काणकोण तालुका समितीतर्फे श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.



सालसेत तालुका समितीतर्फे श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.



तिसवाडी तालुका समितीतर्फे श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.

## अभिनंदन



**सौ. एश्वर्या शरण काटकर**
**(एश्वर्या चिमण पर्वतकर)**

फोंडा यांनी एम. फार्ममध्ये गोवा विद्यापिठातून प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल त्यांचे संस्थेतर्फे अभिनंदन तसेच पुढील कारकिर्दीसाठी संस्थेतर्फे खूप शुभेच्छा.

## अभिनंदन

# सेवाभावी डॉक्टर राजेंद्र बोरकर



आपल्या समाजातील एक सेवाभावी डॉक्टर राजेंद्र बोरकर यांना आरोग्य खात्यात मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून बढती मिळाली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील त्यांचे कार्य हे आम्हा सर्वांना अभिमान वाटावा असेच आहे. आपल्या पेशाकडे नोकरी म्हणून न बघता कर्तव्य भावनेने रुग्णांची सेवा त्यांनी करून लोकांचे आशिर्वाद मिळविले आहेत. कोविड काळात तर जीवावर उदार होऊन त्यांनी कार्य केले आहे. श्री महालसेच्या वास्तव्याने पुनित झालेल्या म्हार्दोळ गावी त्यांचा जन्म झाला. १९८९ मध्ये त्यांची आरोग्य खात्याने नेत्रावळी उपआरोग्य केंद्रात नेमणूक केली. सांगे आरोग्य केंद्राच्या अखत्यारीत त्यांनी दहा वर्षे सेवा दिली. ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा त्यांनी तन-मन अर्पून केली आणि सामान्य जनतेचे आशिर्वाद घेतले. कुडतरी येथे मुख्य आरोग्य केंद्रात आरोग्याधिकारी म्हणून बढती मिळाल्यानंतर आरोग्य शिबिरे, आरोग्य विषयक जागृती मोहीम असे अनेक उपक्रम त्यांनी राबविले. तिथे तीन वर्षे ते कार्यरत होते. त्यानंतर चिखली आरोग्य केंद्रात त्यांची बदली झाली. सडा-वास्को आरोग्य केंद्राचा अतिरिक्त ताबाही त्यांच्याकडे सोपविण्यात आला होता. कोविड महामारीच्या काळात तर त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. वास्कोच्या नगरसेवकांनी कोविड योद्धा म्हणून त्यांचा यथोचित गौरव केला. जिल्हा इस्पितळातील सेवेनंतर त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना कांपाल पणजी येथे आरोग्य खात्यात मुख्य आरोग्य अधिकारी म्हणून बढती देण्यात आली आहे. लसीकरण व इतर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आता ते सांभाळत आहेत. डॉ. राजेंद्र बोरकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**– हेमंत वेलिंगकर**

(गो. म. समाज, फोंडा समितीचे उपाध्यक्ष)



**श्री. रोहिदास नाईक**

(मुळ, नेत्रावळी, सांगे) ताळगांव-पणजी

यांना गोवा सरकारच्या कला व संस्कृती संचालनालयाचा २०२०-२१ या वर्षासाठी कला गौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल गोमंतक मराठा समाजातर्फे हार्दिक अभिनंदन.

# अभिनंदन



कवी, लेखक व ज्येष्ठ पत्रकार
**श्री. संजीव वेरेकार,** सावईवेरें-फोंडा
यांच्या 'रक्तचंदन' ह्या काव्यसंग्रहाला २०२१ चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा. त्यांचा रक्तचंदन काव्यसंग्रह हा २०१९ साली प्रसिद्ध झाला आहे.



**श्री. मनोज म्हार्दोळकर**
यांची दि. ६ जानेवारी रोजी पोलीस उपअधिक्षकपदी निवड झाल्याबद्दल संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.



**श्रीमती नीता प्रशांत म्हार्दोळकर,**
म्हार्देळ-फोंडा
न्यू इंग्लीश हायस्कुल, कुंडई येथे मुख्याध्यापिका म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा.



**कु. जुगल संजय नाईक,** कुर्टी-फोंडा
याने एप्रिल २०२१ परिक्षेत शासकिय तंत्रमहाविद्यालय, पणजी येथून ८५.२९ टक्के मिळवून मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमामध्ये प्रथम येण्याचा मान पटकावला. त्या बद्दल त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच पुढील शैक्षणीक वाटचालीकरिता शुभेच्छा!

# नूतन सभासदांचे हार्दिक स्वागत!!

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नितेश देविदास बांदेकर | काराशिरमल, आगोंद | काणकोण |
| २. | कु. साईली सतीश हळदणकर | हळदणवाडा, मार्शेल | फोंडा |
| ३. | कु. श्रद्धाली सतीश हलदणकर | हळदणवाडा, मार्शेल | फोंडा |
| ४. | श्री. दिनकर गोविंद मोरजकर | वरचावाडा, मोरजी | पेडणे |
| ५. | श्री. अभय ज. केरकर | केरी, फोंडा | फोंडा |
| ६. | श्री. अजय ज. केरकर | बोरी, फोंडा | फोंडा |
| ७. | नयना अभय केरकर | केरी, फोंडा | फोंडा |
| ८. | सौ. शिवानी शिवदास देविदास, | मार्गवाडा, नेत्रावळी | सांगे |
| ९. | श्री. शिवदास सावळाराम देविदास | मार्गवाडा, नेत्रावळी | सांगे |
| १०. | श्री. विनोद बाळकृष्ण देविदास | पांडवसडा, रिवण | सांगे |
| ११. | श्री. प्रथमेश नारायण नाईक | दरबारवाडा, कामुर्ली | बार्देश |
| १२. | श्री. बापू गोविंद नाईक | दरबारवाडा, कामुर्ली | बार्देश |
| १३. | श्री. सिद्धेश रामा पेडणेकर | दरबारवाडा, कामुर्ली | बार्देश |
| १४. | श्री. सचिन सगुण पेडणेकर | दरबारवाडा, कामुर्ली | बार्देश |
| १५. | श्री. वैभव रत्नाकर नाईक | ठाणे, सत्तरी | सत्तरी |
| १६. | सौ. दिपाली अमित फातर्पेकर | वाळपई, सत्तरी | सत्तरी |
| १७. | श्री. अमित अशोक फातर्पेकर | वाळपई, सत्तरी | सत्तरी |
| १८. | श्री. सतीश आनंद आमोणकर | मानसवाडा, रायबंदर | तिसवाडी |
| १९. | श्री. आनंद प्रसाद नाईक | मानसवाडा, रायबंदर | तिसवाडी |
| २०. | श्री. मुद्रा सतिश आमोणकर | मानसवाडा, रायबंर | तिसवाडी |
| २१. | श्री. हेमानंद पुंडलीक पेरणी | यशवंत नगर, फोंडा | फोंडा |
| २२. | श्री. सर्वानंद गुरुदास देविदास | टेंबी, केपे | केपे |
| २३. | श्री. सत्यवान देविदास | असोल्डे, पाडी बार्से, | केपे |
| २४. | श्री. सुरेश पांडुरंग वाघुर्मेकर | आनंदवाडी, सावर्डे | सांगे |
| २५. | दिवीता ज्ञानेश्वर मळकर्णेकर | शिरवई, केपे | केपे |
| २६. | सौ. माया केदार आमोणकर | ॐदत्त सदन, पणजी | तिसवाडी |
| २७. | श्री. धनंजय मंगलदास नाईक | रासय, सालसेत | सालसेत |
| २८. | शिल्पा सुदेश बोरकर | घोगल, मडगांव | सालसेत |
| २९. | श्री. सुदेश सुनिल बोरकर | घोगळ, मडगाव | सालसेत |
| ३०. | श्री. दयानंद सदाशिव मोरजकर | बोड्डा, मडगाव | सालसेत |
| ३१. | श्री. नंदा मोहन फातर्पेकर | केपे-गोवा | केपे |
| ३२. | कु. अजिंक्य चंद्रकांत कामत | महाखाजन, धारगळ | पेडणे |
| ३३. | श्री. चंद्रकांत विष्णू कामत | महाखाजन, धारगळ | पेडणे |

| | | |
|---|---|---|
| ३४. कु. सचिन चंद्रकांत कामत | महाखाजन, धारगळ | पेडणे |
| ३५. श्री. चंद्रकांत रामनाथ मांद्रेकर | नाईकवाडा, मांद्रे | पेडणे |
| ३६. श्री. प्रदिप मधुकर मांद्रेकर | नाईकवाडा, मांद्रे | पेडणे |
| ३७. श्री. विष्णू रामनाथ मांद्रेकर | नाईकवाडा, मांद्रे | पेडणे |
| ३८. श्री. सतिश विठ्ठल मांद्रेकर | नाईकवाडा, मांद्रे | पेडणे |
| ३९. श्री. नितेश विनायक मांद्रेकर | गावडेवाडा, मांद्रे | पेडणे |
| ४०. श्री. महिपाल म. हणजूणकर | आस्कावांडा, मांद्रे | पेडणे |
| ४१. श्री. विलास व. आसगांवकर | आस्कावाडा, मांद्रे | पेडणे |
| ४२. श्री. प्रविण रघुनाथ आसगांवकर | आस्कावाडा, मांद्रे | पेडणे |
| ४३. श्री. महेश चंद्रांकत मांद्रेकर | आस्कावाडा, मांद्रे | पेडणे |
| ४४. श्री. आनंद लोलयेकर | लोलये, कामकोम | कामकोण |
| ४५. श्री. मंजुनाथ वसंत काणकोमकर | किंदळे, काणकोणक | काणकोण |
| ४६. पल्लवी रविंद्र गडकर | काराशिरमळ, आगोंद | काणकोणक |
| ४७. श्री. रत्नदिप आत्माराम नाईक | माडेल, मडगाव | सालसेत |
| ४८. कु. रिशीला उल्हास नाईक | कुकळी, सालसेत | सालसेत |
| ४९. कु. आकांक्षा जितेंद्र शिरगांवकर | कैलासनगर, अस्नोडा | बार्देश |
| ५०. कु. आकांक्षा जितेंद्र शिरगांवकर | कैलासनगर, अस्नोडा | बार्देश |
| ५१. कु. प्रज्ञा प्रकाश उगवेकर | केळशी, कुकळी | सालसेत |
| ५२. कु. रोहीत एकनाथ पेडणेकर | बायणा, वास्को | मार्मगोवा |
| ५३. सौ. रोहिणी रोहित पेडणेकर | बायणा, वास्को | मार्मगोवा |
| ५४. श्री. सुदन मधुकर कुकळकर | कामतनगर, सकुर, पर्वरी | बार्देश |
| ५५. श्री. वामन कस्तुरे नाईक | गावकरवाडा, वांते | सत्तरी |
| ५६. सौ. निशा वामन नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ५७. श्रीमती सुमित्रा सुर्यकांत नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ५८. श्री. लक्ष्मण विष्णू देवळी | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ५९. कस्तुरे विष्णू नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ६०. कु. निशा लक्ष्मण नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ६१. कशिश किशोर नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ६२. श्री. किशोर लता नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ६३. श्रीमती अश्विनी आनंद नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ६४. श्री. आनंद कस्तूरे नाईक | गांवकरवाडा, वांते | सत्तरी |
| ६५. श्री. यशांक दिपक काणकोणकर | नवेवाडे, वास्को | मार्मगोवा |
| ६६. सौ. क्षितीजा यशांक काणकोणकर | नवेवाडे, वास्को | मार्मगोवा |
| ६७. श्री. सुरेश भिकारो गुरव | झुवारीनगर, वास्को | मार्मगोवा |

# आपल्या समाजाचे भूषण शुभलक्ष्मीबाई मांद्रेकर



पाच दशकांपूर्वी गोव्यात शास्त्रीय नृत्याचा (कथ्थक) प्रचार आणि प्रसार करण्यात अपूर्व असे योगदान दिलेल्या व आपल्या समाजाचे भूषण असलेल्या बुजुर्ग नृत्यांगना तथा नृत्यशिक्षिका शुभलक्ष्मीबाई मांद्रेकर यांचे ३० जानेवारी २०२२ रोजी वयाच्या ९१ वर्षी निधन झाले.

शुभलक्ष्मीबाई व त्यांचे पती कथ्थकनृत्य कलाकार व बुजुर्ग अष्टपैलू वादक, तबलानवाज कै. पंडित राजारामबुवा मांद्रेकर या दांपत्याने अभिजात हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत व नृत्य क्षेत्रात बजावलेली कामगिरी अभिमानास्पद होती. त्यांचे चिरंजीव ज्येष्ठ तबलावादक मच्छिंद्र व गोरख (आपल्या समाज संस्थेचे माजी अध्यक्ष तसेच कन्या प्रसिद्ध नृत्य शिक्षिका छाया मांद्रेकर यांनी आई-वडिलांचा कलेचा वारसा पुढे चालवला.

मूळ नानोडा येथील शुभलक्ष्मीबाई यांचा जन्म १९३२ साली मुंबईत झाला कुंदनलाल हे त्यांचे पहिले नृत्य गुरु. त्यानंतर चित्रपटात नृत्य करीत असतांना अष्टपैलू वादक, तबलापटू कै. पंडित राजाराम मांद्रेकर यांच्याशी त्यांचा परिचय झाला व त्याचे परिवर्तन विवाहात झाले. कालांतराने गोव्यात स्थायिक झाल्यावर पणजीच्या स्वामी विवेकानंद सोसायटीच्या संगीत विद्यालयात त्यांना कथ्थक नृत्य शिकविण्यास पाचारम करण्यात आले. त्याकाळी गोव्यात सास्त्रीय नृत्य शिक्षणाची सोय नव्हती तसे वातावरण नव्हते. अशावेळी त्यांनी अनेक मुलींना नृत्याची गोडी लावून कथ्थक नृत्यात पारंगत केले. पैकी अनेकांनी गोव्याबाहेर सुद्धा स्पर्धातून यश मिलविले. आजच्या आघाडीच्या सिनेतारका वर्षा उसगावकर यांनी शुभलक्ष्मीबाईंकडूनच नृत्याचे शिक्षण घेतले आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन १९८० साली त्यांना गोवा शासनाने राज्य सांस्कृतिक पुरस्काराने गौरविले होते. शिवाय अनेक संस्थानी त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

**– श्री. नितीन कोरगांवकर**

# डॉ. रामकृष्ण मोरजकर



डॉ. रामकृष्ण मोरजकर यांचा जन्म २१ जानेवारी १९२९ रोजी म्हापसा येथे सुसंस्कृत कुटुंबात झाला. ज्या काळात आपल्या समाजातील एखादा तरुण डॉक्टर किंवा इंजिनिअर होणे म्हणजे दीव्य पार करण्यासारखे असायचे अशा काळात ते डॉक्टर झाले. त्यांचे थोरले बंधू धर्मानंद हे ही प्रतिकूल परिस्थितीवर मात करून पुण्यात जाऊन इंजिनिअर बनले होते. पुणे आपली कर्मभूमी मानून त्यांनी तिथे दिलेल्या योगदानाची दखल घेऊन पुण्याच्या बुधवार पेठेतील एका जागेला धर्मानंद यांचे नाव देण्यात आले होते. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकडे वळले. डॉ. मोरजकर यांनी बेळगाव येथील लिंगाराज महाविद्यालयातून दोन वर्षे विज्ञान शाखेचे शिक्षण घेऊन त्यानंतर बडोदा येथे जाऊन एम्. बी. बी. एस्. पदवी प्राप्त केली. गुजरातमधील आनंद खेडेगावात मिशन हॉस्पिटलमध्ये तसेच महाराष्ट्रातील अहमदनगर येथे वैद्यकीय सेवा केली. मुंबईच्या जे. जे. वैद्यकीय महाविद्यालय हॉस्पिटल मधून अस्तीरोगा विषयक प्रगत शिक्षणही घेतले.

वडिल बंधू लक्ष्मण यांच्या अग्रहास्तव ते १९६६ मध्ये पुन्हा आपल्या जन्मभूमीत परतले ते समाजसेवेचा वसा घेऊनच. अन्साभाट-म्हापसा येथे त्यांनी हॉस्पिटल सुरू केले व त्याला त्यांचे प्रेरणास्थान असलेले बंधू धर्मानंद यांचे नाव दिले. कालांतराने डॉ. मोरजकर यांनी हॉस्पिटल खोर्ली-म्हापसा येथे स्थलांतरीत केले. सेवाभावी डॉक्टर म्हणून त्यांनी लौकीक प्राप्त केला. म्हापसा शहरात सार्वजनिक क्षेत्रातही एकरुप झाले. सहकार क्षेत्रात सांस्कृतिक क्षेत्रातही आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. बार्देश बाजार, म्हापसा बाजार, म्हापसा अर्बन बँक या संस्थात ते सक्रिय राहिले.

गोमंतक मराठा समाजाचे कार्य पुढे नेण्यासाठी त्या काळी मनुष्यबळ कमी पडत होते अशावेळी दूरदृष्टीचे, समाजकार्यकर्ते बाबन नाईक यांनी त्यांना हेरले व संस्थेच्या कार्यात सामावून घेतले व १९८२ पासून ते संस्थेसाठी सक्रीयपणे वावरले. १९८३ ते ८७ या काळात त्यांनी संस्थेच्या अध्यक्षपदाची धुराही सांभाळली आणि समाजापासून दूर असलेल्यांना जवळ करून समाजबांधणीत त्यांना सहभागी करून घेतले. सर्वांना बरोबर घेऊन जाणे, विनयशिलता, केलेल्या कामाचे श्रेय न उपटणे आणि कोणताही गाजावाजा न करता कर्तव्यभावनेने समाजासाठी कार्य करत रहाणे हे डॉक्टरांचे गुण आदर्शवत असेच होते. भाऊसाहेब बांदोडकरांच्या कारकीर्दीत महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते त्यानंतर म. गो. पक्षात दुफळी माजल्यानंतर काँग्रेसवासी झाले तेथेही ते कार्यकर्ता म्हणूनच सक्रीय राहिले. परंतु कधीही पदाची अपेक्षा धरली नाही. राजकारणापेक्षा डॉक्टर समाजाकराणातच रमले. त्यांचा पिंडच मुळी समाज सेवकाचा होता.

डॉक्टारांनी जवळ जवळ सहा दशके समाजासाठी केलेले कार्य हे मौलीक स्वरुपाचे होते. सेवाभावी डॉक्टर, सहकार क्षेत्रातील योगदान, तळमळीने केलेले समाजकार्य याचा आम्हाला

सार्थ अभिमान आहे व याची दखल घेऊन गोमंतक मराठा समाजाने, स्व. भाऊसाहेब बांदोडकर स्मृती पहिला समाज भुषण पुरस्कार देऊन त्यांना गौरविले. दि. ११ नोव्हेंबर २०२१ रोजी डॉक्टरांनी ह्या जगाला निरोप घेतला. त्यांची प्राणज्योत मालवली असलीतरी त्यांच्या कार्याचा प्रकाश आम्हाला प्रेरणा देत राहील. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**– श्री. नितीन कोरगांवकर**

# सहवेदना

दुखःद निधन झालेल्या समाज बांधवांच्या आत्म्यास शांती लाभो
अशी ईश्वर चरणी प्रार्थना.



**वनिता श्रीपाद साखळकर**
वरची हळी, साखळी
मृत्यू : दि. १७-१२-२०२१



**उल्हास रमाकांत नाईक**
वाझवाडा, वेळ्ळी, मडगांव
मृत्यू : दि. ६-१-२०२२



**चंद्रकांत (बाबू) गोविंद नाईक**
यांचे दि. २८-११-२०२१ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ते गोमंतक मराठा समाज संस्थेचे ज्येष्ठ समाज बांधव होते. त्यांनी संस्थेत विविध पदावर कार्य केले. १९८३-८५ व १९९८ ते २००२ साली खजिनदार, १९८७-१९८९ उपाध्यक्ष म्हणून पद सांभाळले. संस्थेच्या कार्यात त्यांचा सदैवच हातभार असे. समाजाच्या संघटना बळकट करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. संस्थेतर्फे राबवण्यात येणाऱ्या उपक्रमात आर्थिक मदत करून सदैव प्रोत्साहन देत असत.

**दिपेश दिलीप पर्वतकर**
पैगीण - काणकोण
मृत्यू : दि. १८ ऑक्टोबर २०२१



डियोली येथील नियोजित शैक्षणिक प्रकल्प

# गोमंतक मराठा समाज - गोवा

-: चिटणीस :-

**श्री. मंगेश भि. कुंडईकर**

मो. : ९८२२१२१८९४

-: सं. चिटणीस :-

**श्री. सतीश अ. पैंगिणकर**

मो. : ९४२३१८०५२५

-: मुखपत्र समन्वयक :-

**श्री. सुनील फातर्पेकर**

मो. : ९९२१०१६१४८

दयानंद स्मृती, स्वामी विवेकानंद मार्ग, पणजी-गोवा
४०३००१, दूरध्वनी - (०८३२) २२२६०९९
Email : gomantakmarathasamajgoa@gmail.com
Website : www.gomantakmarathasamajgoa.org

-: संपादक :-

**श्री. नितीन वि. कोरगावकर**

मो. : ९४२२४४३५१८

-: व्यवस्थापक, मुद्रक व प्रकाशक :-

**श्री. आनंद घ. वाघुर्मेकर**

यांनी गोमंतक मराठा समाज - गोवा करिता दयानंद स्मृती पणजी-गोवा येथे प्रकाशित केले.

-: छपाई :-

**शरद एन्टरप्रायझेस**

ओल्डगोवा, मोबाईल - ९८८१४०९२३७